**CNR No. :- MHSI100003092018**

**–: नियमित दिवाणी मुकदमा क्र. ३८/२०१८ :–**

**–: निशाणी ९१ वरील आदेश :–**

वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश XXII नियम ४ अन्वये मयत प्रतिवादी क्र. १६ विरुद्ध पारीत झालेला (Abatement) चा आदेश रद्दबातल होऊन मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

०२. प्रस्तुत अर्जात वादी यांनी असे कथन केले आहे की, सदर दाव्यातील प्रतिवादी क्र. १६) श्रीम. सिताबाई रामा ठाकुर ही दि.१२/०७/२०२३ रोजी मयत झालेली आहे. सदर मयत प्रतिवादी क्र. १६ हिचे वारस प्रतिवादी क्र. १४ व १५ हे यापूर्वीच सदर दाव्यात सामील आहेत. त्यामुळे प्रतिवादी क्र. १६ हिचे नाव कमी करणे आवश्यक आहे. सदर दाव्याच्या न्यायपुर्ततेकामी प्रतिवादी क्र. १६ हिच्या नावासमोर मयत असे नमुद करुन प्रतिवादी क्र. १६ हिचे नाव कमी करावयाचे आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. १६ विरुद्ध झालेला अबेटमेंटचा आदेश रद्दबातल करण्याकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

०३. प्रस्तुत अर्जाकामी प्रतिवादी यांचे म्हणणे मागविण्यात आले. प्रतिवादी यांना अर्जाकामी म्हणणे सादर करण्याची उचित संधी उपलब्ध करुन देऊनही त्यांनी त्यांचे म्हणणे विहीत मुदतीत सादर न केलेने दि.०९/०७/२०२४ च्या आदेशान्वये त्यांच्या विरुद्ध सदरचा अर्ज विना म्हणणे चालविणेत आला.

०४. अर्ज व कागदपत्रांचे अवलोकन केले. विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०५. दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादी क्र. १६ चे वारस अभिलेखावर येणे आवश्यक आहे. अर्ज नामंजूर झाल्यास अर्जाच्या अनुषंगाने विविध कायदेशीर कामे चालविण्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी न्यायाच्या कारणे प्रतिवादी क्र. १६ विरुद्धचा अपशमन (Abatement) आदेश रद्दबातल करणे न्यायोचित आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश करणेत येत आहे.

**–:: आदेश ::–**

१. अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by KUMBHAR RANJANA GOVIND
Date: 2025.04.08 16:16:03 +0530

ठिकाण – दोडामार्ग. (आर. जी. कुंभार)

दिनांक – ०८.०४.२०२५. जादा सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर)
दोडामार्ग.